पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

.....................................................................................................

# वार्तापत्र

**दिनांक- ०९/१०/२०२०**

## गडचिरोली पोलीस दलाच्या पुढाकाराने अतिदुर्गम भामरागड पंचक्रोशीतील २१ बेरोजगार तरुणांना मिळाला रोजगार

नक्षलवादी हे गडचिरोली जिल्हयातील दुर्गम व अतिदुर्गम भागातील आदिवासी विदयार्थ्यांच्या शिक्षणाला विरोध करुन त्यांना शिक्षणापासुन वंचित करण्याचा प्रयत्न करतात. तसेच शिक्षणाच्या प्रवाहात असलेल्या अनेक विदयार्थ्यांची दिशाभुल करुन त्यांना दलममध्ये भरती करुन त्यांचे भविष्य उद्ध्वस्त करतात. तसेच सुशिक्षीत तरुणांनी नोकरीपासुन वंचित रहावे म्हणुन जीवानिशी ठार करण्याच्या धमक्या देतात, त्यामुळे अतिदुर्गम भागातील अनेक तरुण सुशिक्षीत व गुणवत्ताधारक असतांनाही रोजगारापासुन वंचित राहीलेले आहेत. अशा सुशिक्षीत बेरोजगार तरुणांना रोजगार मिळवुन देण्याच्या उद्देशाने तसेच त्यांना स्वतःच्या पायावर उभे करुन त्यांचे उज्वल भवितव्य घडविण्यासाठी गडचिरोली पोलीस दलाने अनेक नाविण्यापुर्ण उपक्रम हाती घेतलेले आहेत.

भामरागड सारख्या अतिदुर्गम भागातील बेरोजगार तरुणांना रोजगार उपलब्ध करुन देण्याचे उद्देशाने, मा. पोलीस अधीक्षक श्री. अंकित गोयल यांचे मार्गदर्शनाखाली व नेतृत्वात भामरागड येथील उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. कुणाल सोनवाणे व भामरागड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संदिप भांड यांनी एका खाजगी कंपनीत २१ सुशिक्षीत तरुणांना रोजगाराची संधी उपलब्ध करुन दिली आहे. गडचिरोली पोलीस दलाच्या पुढाकाराने या २१ बेरोजगार तरुणांना हैद्राबाद येथे सिक्युरिटी गार्ड म्हणुन नोकरी मिळवुन देण्यात आली आहे. यामुळे गडचिरोली पोलीस दलाच्या या नाविण्यापुर्ण उपक्रमामुळे अतिदुर्गम भामरागड भागातील तरुणांमध्ये नवचैतन्याचे वातावरण पसरलेले असुन या भागातील अनेक तरुण–तरुर्णींनी रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी गडचिरोली पोलीस दलाकडे नाव नोंदणी केलेली आहे. रोजगार मिळालेल्या २१ तरुणांनी व त्यांच्या कुटुंबियांनी गडचिरोली पोलीस दलाचे आभार मानले आहे.


पोलीस स्टेशन भामरागड जि.गडचिरोली
NO PARKING
Shot on OnePlus

